* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

## दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या टोळीस शस्त्रासह अटक
## १,४१६६०/- रु. चा मुददेमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कार्यवाही.

जिल्हा पोलीस अधिक्षक वसंत परदेशी यांनी वाशिम जिल्हयातील मालमत्तेचे गुन्हेगारांवर प्रतिबंध करण्याच्या उददेशाने वेळोवेळी विशेष मोहीम राबवुन गुन्हयांवर अंकुश निर्माण केला आहे. दिनांक २५/०५/२०१९ रोजी पोलीस उपनिरीक्षक दिनकर गोरे यांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, ग्राम पांगरखेडा येथील लक्ष्मण मधुकर चव्हाण याने त्याचे साथीदारासह यापुर्वी जानेफळ जि. बुलढाणा येथे दरोडयाचा गुन्हा केला आहे. आज रोजी लक्ष्मण चव्हाण हा त्याचे साथीदारांसह पोलीस स्टेशन मालेगाव परिसरात दरोडा टाकण्याच्या उददेशाने पांगरखेडा ते डोंगरकिन्ही मार्गे मालेगाव येथे जाणार आहे अशा खात्रीलायक बातमीवरुन मा. पोलीस निरीक्षक शिवा ठाकरे यांना माहिती दिली असता पोनि शिवा ठाकरे यांनी मिळालेल्या माहितीची मा. पोलीस अधीक्षक श्री. वसंत परदेशी यांना माहिती देवुन त्यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा वाशिम येथील अधिकारी कर्मचारी यांचे दोन वेगवेगळे पथक तयार करुन मिळालेल्या माहितीप्रमाणे ग्राम डोंगरकिन्ही येथे रवाना केले. पथकाने डोंगरकिन्ही ते पांगरखेडा रोडवर डोंगरकिन्ही पासुन अंदाजे ५०० मिटर अंतरावर उमेश देशमुख यांचे शेतात सापळा रचुन बसले असता पांगरखेडा गावाकडुन एकामागुन एक अशा दोन मोटारसायकल येतांना दिसल्या नमुद पथकाने लगेच रोडवर येवुन त्या दोन्ही मोटारसायकल थांबविल्या त्यावेळी समोरील मोटारसायकलवर दोन इसम व मागील मोटारसायकलवर तिन इसम बसलेले होते. मागील मोटरसायकलवरील ट्रिपल सिट बसलेल्या इसमापैकी तिस-या इसमाने गाडीवरुन उतरुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला असता पथकातील कर्मचा-यांनी त्यांचा पाठलाग करुन त्याला ताब्यात घेतले. संशय बळावल्याने पथकाने त्या दोन्ही मोटारसायकलवरील पाचही इसमांना त्यांचा व पंचाचा परिचय देवुन त्यांचे नाव गाव विचारुन अंगझडती घेतली असता १. लक्ष्मण मधुकर चव्हाण याच्या जवळील काळयारंगाचे बॅग मधुन एक फरशी कु-हाड, काळयारंगाची कटर कैची, पेंचीस लोखंड कापण्याचे करवत, एक लहान पकड, मोठा पेचकस, एक लहान गॅस सिलेंडर नोजलसह, मिरची पावडर पाउच, रस्सी व धारदार स्टील पात्याचा सुरा असा १५४०/- रु. चा मुददेमाल, नगदी १२०/- रु व दोन मोटारसायकल किमंत १४००००/- रु. असा एकुण १४१६६०/- रु. चा मुददेमाल दरोडा घालण्याकरीता उपयोगात येणारे मददेमाल १. लक्ष्मण मधुकर चव्हाण २. सज्जन मधुकर चव्हाण ३. कन्हैया मधुकर चव्हाण सर्व रा. पांगरखेडा ४. राजु किरीम पवार, ५. रामेश्वर किरीम पवार दो.रा. जानेफळ जि.बुलढाणा यांचेजवळुन जप्त करुन पोलीस स्टेशन मालेगाव येथे जमा करण्यात आला.

सदर ची कामगीरी जिल्हा पोलीस अधिक्षक वसंत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी ठाकरे, पोलीस उप निरीक्षक दिनकर गोरे, सपोउपनि/भगवान गावंडे, नारायण जाधव, पोहेकॉ/नंदकिशोर नंदकुले, नापोकॉ/किशोर चिंचोळकर, प्रशांत राजगुरु, सुनिल पवार पोकॉ/राम नागुलकर, संतोष शेणकुडे, अशोक बैरवार, अमोल इंगोले, निलेश इंगळे,अमोल एकाडे, मिलींद गायकवाड महिला कर्मचारी तहेमिना शेख, पुजा पडवाल यांनी केली आहे. अशा प्रकारे नमुद पथकाने केलेल्या कारवाईमुळे गंभीर स्वरुपाच्या गुन्हयास प्रतिबंध झाला आहे. जिल्हा पोलीस अधिक्षक वाशिम यांनी मालमत्तेचे गुन्हे करणारे गुन्हेगाराविरूध्द आरंभलेल्या मोहिमेत सातत्यपुर्ण कार्यवाही केल्याने जनतेत सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

Sthakare

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम